# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०३.०८.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, अंमली पदार्थ विरोधी तथा भारतीय शस्त्र कायदा अंतर्गत धडक मोहीम :—**

मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), मा. अपर पोलीस आयुक्त (उत्तर व दक्षिण प्रादेशीक विभाग), गुन्हेशाखा व परिमंडळीय पोलीस उपआयुक्त यांचे मार्गदर्शनात, नागपुर शहर अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्दीत नागपुर शहर पोलीसांनी कायदा व सुव्यवस्थेचे दृष्टीने तसेच, गुन्हेगारांवर वचक बसावा याकरीता दिनांक ३१.०७.२०२६ ते दिनांक ०२.०८.२०२६ चे दरम्यान, तीन दिवसीय विशेष मोहीमेअंतर्गत अवैध दारू/अंमली पदार्थ/शस्त्रे बाळगणारे वा विक्री करणारे ईसमांवर कारवाई करून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करून, आरोपींवर कायदेशीर कारवाई करून त्यांचेविरोधात गुन्हे दाखल केले.

नागपूर शहरातील सर्व पोलीस ठाणे व गुन्हेशाखा पोलीसांनी नमुद मोहीमेदरम्यान नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्दीत १) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ३६ केसेसमध्ये एकुण ३६ इसमांवर कारवाई करून रू. ४९,८००/— चा मुद्देमाल जप्त केला. २) एन.डी.पी.एस. कायद्यान्वये अंमली पदार्थ संबंधीत ०८ केसेसमध्ये कारवाई करुन गुन्हे दाखल केले व एकुण १३ आरोपींना अटक करुन त्यांचे ताब्यातुन एकुण ४७,५०,०२५/— रु. चा मुद्येमाल जप्त केला. ३) भारतीय शस्त्र अधिनियम अंतर्गत एकूण ११ केसेसमध्ये ११ इसमांवर कारवाई करून, आरोपींचे ताब्यातुन १२ वेगवेगळी शस्त्रे जप्त केली. ४) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १०७,११६,११०,११२,१०२,११७ अन्वये एकूण **३९३** प्रतिबंधात्मक कारवाई केल्या आहेत.

**२) गणेशपेठ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.**

दिनांक ०२.०८.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, जाधव चौक परिसरात एक इसम संशयीतरित्या दिसुन आल्याने त्यास आवाज दिला असता, तो पळाल्याने त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव बादल संजय संतापे वय २७ वर्षे रा. रमानगर, आसोलेचे घराजवळ, नवीन कामठी, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक स्टेनलेस स्टीलचा चाकू मिळून आल्याने किंमती ३००/—रू. चा जप्त करण्यात आला. आरोपीस पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. ०९/२०२६, दिनांक ३०.०५.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि अतुल तावडे, सफौ समीर शेख, पोअ. प्रतिक इटनकर, वैभव यादव, पवन मालखेडे यांनी केली

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सदर :— शस्त्रे बाळगणाऱ्या दोन आरोपींना अटक.**

दिनांक ०३.०८.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, सदर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, कस्तुरचंद पार्क, ११८ बटालियन गेटसमोरुन दोन इसम पोलीसांना पाहून संशयीतरित्या अंधारात गेल्याचे दिसल्याने, त्यांना घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांना त्यांची नावे पत्ते विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) प्रज्वल विशाल शेंडे वय २४ वर्षे २) आयुष सतिश माडगोईनवार वय २३ वर्षे दोन्ही रा. मोहन नगर, खलाशी लाईन, सदर. नागपूर असे सांगीतले. आरोपीची अंगझडती घेतली असता, क्र. १ चे ताब्यातुन एक लोखंडी चाकु बोटांची पकड असलेला किंमती १,०००/— रू. चा व क्र. २ चे कंबरेत एक डिझाईन असलेला लोखंडी चाकु कि. ५००/— रु. चा मिळून आल्याने एकूण १५००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सदर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म. पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कोतवाली :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी स्वरूप रूपराव प्रांजळे वय ४६ वर्षे, रा. घर क्र. ४९८, तेलीपुरा, लाकडीपुल, नवाबपुरा रोड, महाल, नागपूर हे घरूनच सराफा व्यवसाय करतात, त्यांची ओळख आरोपी हर्ष उर्फ हरिष कृष्णराव शास्त्रकार वय ४० वर्ष, रा. कडु उद्यानजवळ, छोटी मस्जीदजवळ, नवाबपुरा, नागपुर याचे सोबत ०२ वर्षापासुन होती. आरोपी याने त्याचा कार खरेदी विक्रीचा व्यवसाय असल्याचे फिर्यादी यांना सांगीतले होते. दिनांक २९.०४.२०२६ रोजी आरोपीने फिर्यादीस मारोती अर्टीगा कार क्रं. एम एच ४९ यु २०४३ चे मालक गणेश दयाराम काळबांडे वय ६१ वर्षे, योना मेडीकल ईमरजंसी असल्याने विकायची आहे असे सांगीतले. फिर्यादी यांना कार खरेदी करायची असल्याने १,८०,०००/—रू. मध्ये सौदा ठरला. फिर्यादी यांनी आरोपीस ऑनलाईन १,५०,०००/—रू. दिले. आरोपीने फिर्यादी यांना वाहनाचे कागदपत्रे, करारनामा व वाहनाची चाबी दिली. उर्वरित ३०,०००/— रु. आरटीओ प्रक्रिया पुर्ण झालेवर देण्याचे ठरले. फिर्यादी यांनी वाहन त्यांचे घराजवळ उभे केले असता, ते न दिसल्याने फिर्यादी यांनी खात्री केली असता, आरोपी याने वाहनाचे मुळ मालक काळबांडे यांचेकडून त्यांचे वाहन कंपनीत लाऊन देतो, असे म्हणून ॲग्रीमेंट करुन कागदपत्रासह गाडी घेतली व फिर्यादीसोबत परस्पर वाहनविक्रीचा करारनामा करुन रक्कम घेतली. फिर्यादीने आरोपीस संपर्क केला असता, फोन बंद होता तसेच त्याचे घरी गेले असता, घरी मिळून आला नाही. आरोपीने फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन १,५०,०००/—रू. ची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे मपोउपनि. शितल जासुद यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे अंबाझरी :—** लक्ष्मी लखन पगाडे वय ५० वर्षे, रा. इमलीटोला, ता. केवलारी, शिवनी, मध्यप्रदेश ह.मु. प्लॉट क्र. १४८, शिवाजीनगर, अंबाझरी, नागपूर हे दिनांक ०१.०८.२०२६ चे ११.१० वा. पासुन

पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील राहते ठिकाणावरुन 'मुझे गाव जाना है' असे म्हणून निघुन गेले. गावाला पोहोचले नाही तसेच घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ६ इंच, केस–काळे, अंगात–हिरवा पांढरा चौकडीचा शर्ट व काळा लोअरपॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी बोलतात. ओळखचिन्ह– मानसिक रुग्ण असून उजवे हातावर लक्ष्मी नाव गोंदलेले आहे.

**२) पोलीस ठाणे अजनी :–** मिना सुनिल जयस्वाल वय ३५ वर्षे रा. सावित्रीबाई फुले नगर, अशफाक उल्ला मार्ग, अजनी नागपूर हया दिनांक २५.०७.२०२६ चे १९.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरुन कोणाला काही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–५ फुट, केस–काळे, अंगात–पिवळा टॉप व जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात.



लक्ष्मी



मिना

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**